www.sarkarrajpress.com

# सरकार राज

Email: sarkarraj.gurav3@gmail.com

वर्ष : २० ❍ अंक : २६ ❍ ठाणे ❍ दि. ९ ते १५ जून २०२६ ❍ RNI No. MAHMAR/2009/34640 ❍ पाने - ४ ❍

## उलवेत वारंवार वीजपुरवठा खंडित

### महिलेचा भावनिक व्हिडीओ व्हायरल

**नवी मुंबई :** उलवे सेक्टर-८ परिसरात गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या वारंवार वीज खंडित होण्याच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर एका महिलेने सोशल मीडियावर पोस्ट केलेला भावनिक व्हिडीओ सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. या व्हिडीओमध्ये तिने वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे नागरिकांना होत असलेल्या हालअपेष्टांची व्यथा मांडली आहे.

नवी मुंबईतील उलवे सेक्टर-८ येथे राहणाऱ्या एका कामकाजी महिलेने सोशल मीडियावर भावनिक व्हिडीओ पोस्ट करत परिसरातील वीजपुरवठा समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. महिलेच्या म्हणण्यानुसार, गेल्या आठवडाभरापासून परिसरात वारंवार आणि दीर्घकाळ वीज



खंडित होत आहे.व्हिडीओमध्ये ती सांगते की, रात्री सुमारे ११ वाजता कामावरून घरी परतल्यानंतर तिला विश्रांतीची गरज असते. मात्र, अनेकदा पहाटे ४ ते ५ वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याने तिला झोपही मिळत नाही. सकाळी ६ वाजता पुन्हा कार्यालयासाठी बाहेर पडावे लागत असल्याने तिची मोठी गैरसोय होत असल्याचे तिने सांगितले.भावनिक होत अश्रूंना वाट मोकळी करून देताना तिने सलग अनेक दिवस झोप न झाल्याची खंत व्यक्त केली. उकाडा, अंधार आणि वारंवार होणारे वीज खंडित होणे यामुळे परिसरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असल्याचेही तिने नमूद केले.हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून अनेक नागरिकांनी त्याला पाठिंबा दर्शवत उलवे परिसरातील वीज समस्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या समस्येबाबत महावितरणकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. नागरिक मात्र लवकरात लवकर अखंडित वीजपुरवठ्याची अपेक्षा व्यक्त करत आहेत.

## नेरूळ विभाग कार्यालयावर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा मोर्चा!

**नवी मुंबई :** नेरूळ विभागात नागरिकांच्या समस्यांचा अक्षरश: डोंगर साचल्याच्या निषेधार्थ उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी नेरूळ विभाग कार्यालयावर धडक मोर्चा काढत प्रशासनाला जाब विचारला.

यावेळी रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांबाबतच्या अनेक तक्रारी अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आल्या. विभाग अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत समस्यांचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले.

मात्र, १५ दिवसांत ठोस कार्यवाही झाली नाही तर अधिक तीव्र आणि वेगळ्या पद्धतीचे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी देत प्रशासनाला अंतिम मुदत दिली. नागरिकांच्या प्रश्नांवर प्रशासनाने केवळ आश्वासनांची खैरात न करता प्रत्यक्ष कामे करून दाखवावीत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

## आरएसएसला १०० वर्षे पूर्ण; नेरुळमध्ये हिंदू संमेलन संपन्न




**नवी मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने नेरुळ येथे हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हिंदू समाजाने संघटित होण्याची आवश्यकता, संस्कृतीचे जतन आणि सामाजिक ऐक्य यावर मार्गदर्शन करण्यात आले.

वक्त्यांनी सध्याच्या काळात हिंदू संस्कृतीवर विविध प्रकारची आव्हाने निर्माण होत असल्याचे सांगत समाजाने जागृत राहण्याचे आवाहन केले. तसेच संघाच्या पंच परिवर्तन संकल्पनेचा उल्लेख करत स्वदेशी वस्तूंचा वापर वाढविण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## महागाई विरोधात नवी मुंबईतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे केंद्र सरकार विरोधात अनोखे आंदोलन

**नवी मुंबई :** महागाई आणि इंधन दरवाढीच्या विरोधात नवी मुंबईतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने वाशी गावदेवी मंदिर परिसरातील पेट्रोल पंपावर मेलोडी चॉकलेट वाटप करून केंद्र सरकारच्या विरोधात अनोखे आंदोलन छेडले.

महागाईची कडू चव आणि सरकारची गोड आश्वासने असा टोला लगावत आंदोलनकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पेट्रोल, डिझेल, गॅस आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले असून केंद्र सरकार जनतेच्या प्रश्नांपासून दूर गेल्याचा



आरोप यावेळी करण्यात आला.

मोदी सरकारच्या धोरणांचा निषेध व्यक्त करत उबाठा गटाचे जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. वाढती महागाई आणि इंधन दरवाढीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून त्याचाच उद्रेक या आंदोलनातून पाहायला मिळाल्याची चर्चा रंगली आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ‘लीव्हज् अ मार्क’ अभिनव लक्षवेधी उपक्रम

### २४०० हून अधिक नागरिकांचा सहभाग; ४० किलो प्लास्टिक संकलनातून मॅंग्रोव्ह संवर्धनाला हातभार

**नवी मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून प्लास्टिकमुक्त नवी मुंबई संकल्पनेसाठी काम करणाऱ्या प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या व माईंडस्पेस रिटल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (REIT) यांच्या संयुक्त विद्यमाने ऐरोली येथील माईंडस्पेस बिझनेस पार्कमध्ये‘लीव्हज् अ मार्क’ हा जनजागृतीपर अभिनव



उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या अंतर्गत नवी मुंबईतील खारफुटी (मॅंग्रोव्ह) परिसंस्थेचे महत्त्व आणि प्लास्टिक प्रदूषणामुळे होणाऱ्या घातक परिणामांविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली.

‘नवी मुंबई प्लास्टिक आणि ई-वेस्ट रिसायक्लोथॉन’ उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या‘लीव्हज् अ मार्क’ या उपक्रमात २४०० हून अधिक नागरिक, कर्मचारी आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. एका ३२ फूट x ४८ फूट आकाराच्या भव्य कॅनव्हासवर नागरिकांच्या पाऊलखुणांद्वारे मॅंग्रोव्ह परिसंस्थेचे चित्र साकारण्यात आले. हिरव्या आणि निळ्या रंगांच्या मानवी पाऊलखुणांनी मॅंग्रोव्हची झाडे व जलमार्गांचे प्रतिकात्मक लक्षवेधी चित्रण करण्यात आले.

या मोहिमेमध्ये २,४०० हून अधिक प्लास्टिकच्या बाटल्या आणि कंटेनर यांचे संकलनकरण्यात आले. त्याचप्रमाणे साधारणत: ४० किलो प्लास्टिक कचरा पुनर्वापरासाठी पाठविण्यात (उर्वरीत पान २ वर)

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महापालिका मुख्यालयात बीजमोदकांची रांगोळी




**नवी मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्याप्रमाणेच नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयाच्या तळमजल्यावरील पॅसेजमध्ये ‘झाडे लावा - झाडे जगवा’, ‘बचत पाण्याची - गरज काळाची’ असा संदेश प्रसारित करणारी लक्षवेधी रांगोळी काढण्यात आली होती. या भव्यतम रांगोळीचे वैशिष्ट्य म्हणजे या रांगोळीत विविध रंगाप्रमाणेच २ हजार बीजमोदकांचा उपयोग करण्यात आला होता. विविध देशी वृक्षांची बीजे पातळ कपड्यात गुंडाळून व त्यावर मातीचा थर देऊन मोदकाच्या आकाराचे बीजमोदक तयार करण्याची अभिनव संकल्पना प्रभात ट्रस्ट ही सेवाभावी संस्था राबवित असून हे बीजमोदक कुठेही मोकळ्या जागी टाकल्यास त्यातून नैसर्गिकरित्या वृक्षारोपण करण्याचा हा अभिनव उपक्रम आहे. विशेष म्हणजे हे बीजमोदक महिला बचत गटांतील महिलांमार्फत तयार केले जात असून या माध्यमातून त्यांनाही रोजगार उपलब्ध होत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने हे २ हजार बीजमोदक घेऊन त्यापासून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत सुप्रसिध्द रंगावलीकारश्रीहरी पवळे यांच्या माध्यमातून ही आकर्षक बीजमोदक रंगवली साकारली आहे. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी रंगावलीचे अवलोकन करीत या पर्यावरणशील संकल्पनेचे कौतुक केले.

## एनएमएमटी बस अपघातांच्या मालिकेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम प्रवाशांसाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक सेवा म्हणून ओळखला जातो. मात्र, गेल्या काही महिन्यांत शहरातील विविध भागांत एनएमएमटी बसच्या वाढत्या अपघातांमुळे या सेवेच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे प्रवासी, वाहनचालक आणि पादचारी यांच्यात चिंतेचे वातावरण पसरले असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही टीका होत आहे.

अलीकडेच वाशी सेक्टर-७ परिसरात एनएमएमटी बस पदपथावर चढल्याची घटना घडली. सुदैवाने या दुर्घटनेत मोठी जीवितहानी टळली, मात्र या घटनेने बससेवेच्या सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित केले आहेत. नागरिकांच्या मते, अशा घटना अपवाद राहिलेल्या नसून त्या आता सातत्याने घडत आहेत.

चालकांच्या प्रशिक्षणावर प्रश्न गेल्या काही महिन्यांत घडलेल्या सलग अपघातांमुळे चालकांच्या प्रशिक्षणाची गुणवत्ता, त्यांची कार्यक्षमता आणि सुरक्षिततेबाबतची जाणीव यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. वाहतूक नियमांचे पालन, वेगमर्यादेचे भान आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य याबाबत पुरेशी दक्षता घेतली जात नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

विशेषत: ‘वेट-लीज’ तत्त्वावर चालवल्या जाणाऱ्या बससेवांमध्ये कार्यरत चालकांच्या प्रशिक्षणाची आणि त्यांच्या तांत्रिक क्षमतेची नियमित तपासणी केली जाते का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. चालकांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याची नियमित वैद्यकीय तपासणी करण्याची मागणीही जोर धरत आहे.या घटनांमुळे एनएमएमटीच्या वाहन व्यवस्थापन, देखभाल आणि चालक प्रशिक्षण प्रक्रियेबाबत गंभीर शंका व्यक्त केल्या जात आहेत.

नागरिकांच्या मते, केवळ अपघातानंतर चौकशी करण्याऐवजी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. सर्व चालकांसाठी सक्तीचे सुरक्षितता प्रशिक्षण, नियमित आरोग्य तपासणी, वाहनांची तांत्रिक तपासणी आणि वेग नियंत्रण यंत्रणांची अंमलबजावणी यासारख्या उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी होत आहे.

**अपघातांची वाढती मालिका**

**गेल्या चार महिन्यांत एनएमएमटी बसशी संबंधित अनेक अपघात घडले आहेत. त्यामध्ये**

- **८ मार्च - कोपरी सिग्नल परिसरात अतिवेगामुळे भीषण अपघात.**
- **१५ एप्रिल - वाशीतील अरेंजा कॉर्नर शाळेजवळ सिग्नलवर बसची कारला जोरदार धडक.**
- **९ मे - आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात बस -कारचा अपघात.**
- **१२ मे - तुर्भे डेपोमध्ये चालकाच्या हलगर्जीपणामुळे बस उलटली.**
- **जून - वाशी सेक्टर-७ डेपो परिसरात बस पदपथावर चढली.**

## घणसोलीत भूखंडांवरील अनधिकृत बांधकामांवर सिडकोची कारवाई; अतिक्रमणे निष्कासित



**नवी मुंबई :** घणसोली नोडमधील सिडकोच्या मालकीच्या भूखंडांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत अतिक्रमणांवर सिडको प्रशासनाने गुरुवारी ता (४)धडक कारवाई करत अतिक्रमणे निष्कासित केली. या कारवाईमुळे संबंधित परिसरातील अनधिकृत बांधकामांवर आळा घालण्याच्या सिडकोच्या भूमिकेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घणसोली नोड सेक्टर क्रमांक ४ मधील भूखंड क्रमांक २४१ या सुमारे ९०० चौ. मीटर क्षेत्रफळाच्या जागेवर तसेच घणसोली नोड सेक्टर क्रमांक २७ आणि मौजे गोठीवली येथील सर्व्हे क्रमांक २३ व ९६ मधील सुमारे १२०० चौ. मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडांवर अनधिकृत अतिक्रमणे व बांधकामे करण्यात आली होती. या अतिक्रमणांमुळे विकासकामांमध्ये अडथळे आल्याने सिडकोने कारवाईचा निर्णय घेतला.

पूर्वनियोजित मोहिमेनुसार सिडकोच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने संबंधित ठिकाणी पोहोचून अनधिकृत बांधकामे हटविण्याची प्रक्रिया सुरू केली. कारवाईदरम्यान एक जेसीबी मशीनच्या साहाय्याने अतिक्रमित संरचना पाडण्यात आल्या. तसेच १५ मजूर आणि एका सुपरवायझरच्या मदतीने परिसर पूर्णपणे अतिक्रमणमुक्त करण्यात आला.

कारवाई सुरळीत आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सिडको पोलीस पथक, सिडको बोर्ड सुरक्षा रक्षक, महाराष्ट्र सुरक्षा बल तसेच स्थानिक पोलीस पथक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार न घडता कारवाई शांततेत पार पडली.

सिडको प्रशासनाकडून नवी मुंबईतील विविध नोडमध्ये वेळोवेळी अतिक्रमणविरोधी मोहिमा राबविल्या जात असून सार्वजनिक व विकासासाठी राखीव भूखंडांवरील अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई केली जात आहे. शहराचा नियोजित विकास, सार्वजनिक सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी आणि सरकारी मालमत्तेचे संरक्षण यासाठी अशा कारवाया आवश्यक असल्याचे सिडको अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## पर्यावरण दिनानिमित्त ‘लीव्हज् अ मार्क’...

(पान १ वरुन)

आला. उपलब्ध वैज्ञानिक अभ्यासांच्या आधारे या प्रयत्नामुळे ठाणे खाडी परिसरातील अंदाजे २८० मॅंग्रोव्ह वृक्षांवरील प्लास्टिकचा संभाव्य ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

संकलित प्लास्टिक हे प्रोजेक्ट मुंबई संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले असून त्यापासून महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांसाठी बाके तयार करण्यात येत आहेत. या उपक्रमात पर्यावरणपूरक आणि पुनर्वापरित साहित्याचाही वापर करण्यात आला.

नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या उपक्रमाची प्रशंसा करीत नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागातून हा उपक्रम राबविला गेला असल्याने त्यामध्ये नागरिकांच्या पर्यावरण जागरुकतेचे प्रतिबिंब पडले असल्याचे सांगितले. नागरिक, प्रशासन आणि उद्योग क्षेत्र यांच्या एकत्रित सहभागातून पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

माईंडस्पेस REITचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक रमेश नायर यांनी भौतिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधण्याच्या संस्थेच्या बांधिलकीवर भर दिला.

प्रोजेक्ट मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थापक विश्वस्त शिशिर जोशी यांनी प्लास्टिक व्यवस्थापन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगत, या उपक्रमामुळे मॅंग्रोव्ह संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती झाल्याचे नमूद केले.

# महापौर सौ.सुजाता पाटील यांनी घेतला घणसोली, ऐरोली, दिघा विभागातील जलस्थितीचा आढावा



**नवी मुंबई :** तीन दिवसांच्या शटडाऊननंतर पूर्ववत पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर गपाण्याच्या येत असलेल्या तक्रारी आता अत्यंत कमी झाल्या असून पूर्ववत पाणीपुरवठा होत असल्याचे अभिप्राय लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून प्राप्त होत आहेत अशी माहिती देत नवी मुंबईच्या महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी घणसोली व ऐरोलीच्या काही भागात आणि दिघा विभागात एमआयडीसीचे पाणी येत असल्याने याही पाण्याची गुणवत्ता जाणून घेण्यासाठी पाहणी करीत असल्याचे सांगितले.

मोरबे धरणापासून नवी मुंबईतील मुख्य जलवाहिनीपर्यंत सर्व ठिकाणच्या पाणी नमुन्यांच्या चाचणीची प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन महापौर व उपमहापौर तेथील स्थानिक नगरसेवकांसह आठवडाभरापासून पाहणी करीत असून आज त्यांनी ऐरोली येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला भेट देत घणसोली,ऐरोली व दिघा विभागातील नगरसेवक व नागरिकांशी संवाद साधत जलस्थितीची तपासणी केली व घराघरांतून संकलित केलेल्या तसेच लोकप्रतिनिधी व नागरिकांनी आणलेल्या पाणी नमुन्यांची समक्ष चाचणी केली. यावेळी एफ प्रभाग समिती अध्यक्ष श्रीम.ललिता मनगरसेवक मनोज हळदणकर, शिवाजी खोपडे, श्रीम.अंजना म्हात्रे, श्रीम.रेश्मा मश्रीम.श्रेया जिरगे, श्रीम. गौरी आंग्रे,श्रीम.चांदनी चौगुले, ॲड.अपर्णा गवते, बंडू केणी तसेच अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता शंकर जाधव व संतोष उनवणे व इतर अधिकारी उपस्थित होते.

यावेळी नगरसेवकांनी एमआयडीसी मार्फत मिळणाऱ्या पाण्याच्या शुध्दतेविषयी शंका उपस्थित केल्या. या अनुषंगाने महापौर महोदयांनी एमआयडीसी मार्फत प्राप्त होणा-या पाण्याच्या नमुन्यांची नियमित तपासणी करावी तसेच भोकरपाड्याच्या जलशुध्दीकरण केंद्राप्रमाणेच एमआयडीसीकडून प्राप्त होणाऱ्या पाण्यासाठी लहान आकाराचे जलशुध्दीकरण केंद्र दिघा येथे बनवावे असे सूचित केले.

## एमआयडीसीत मान्सूनपूर्व वृक्ष छाटणीच्या कामांना बगल ? संभाव्य दुर्घटनांबाबत नागरिकांमध्ये चिंता

**नवी मुंबई :** पावसाळा तोंडावर आलेला असताना नवी मुंबईतील एमआयडीसी क्षेत्रात मान्सूनपूर्व वृक्ष छाटणी आणि धोकादायक वृक्षांची तपासणी याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे आगामी पावसाळ्यात एखादे झाड कोसळून दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमधून उपस्थित केला जात आहे.

नवी मुंबई शहरात नवी मुंबई महानगरपालिका, सिडको आणि एमआयडीसी अशी तीन प्रमुख नियोजन प्राधिकरणे कार्यरत असून तिन्ही संस्थांचे स्वतंत्र उद्यान विभाग आहेत. शहरातील विविध भागांतील वृक्ष संवर्धन, वृक्षारोपण, वृक्ष छाटणी आणि धोकादायक वृक्षांचे व्यवस्थापन या जबाबदाऱ्या संबंधित प्राधिकरणांकडे आहेत. मात्र एमआयडीसी क्षेत्रात वृक्ष व्यवस्थापनाच्या बाबतीत आवश्यक मनुष्यबळ आणि तांत्रिक यंत्रणेचा अभाव असल्याची बाब समोर येत आहे.

२०१६ पूर्वी एमआयडीसी क्षेत्रातील वृक्ष व्यवस्थापनाची बहुतांश कामे नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागामार्फत केली जात होती. मात्र २०१६ मध्ये एमआयडीसीने स्वतंत्र वृक्ष प्राधिकरण स्थापन केल्यानंतर वृक्षतोड, वृक्ष स्थलांतर, वृक्षारोपण आणि संबंधित परवानग्यांची जबाबदारी स्वत:कडे घेतली. त्यानंतर या कामांची अंमलबजावणी प्रामुख्याने खाजगी सल्लागारांच्या माध्यमातून केली जात असल्याचे सांगितले जाते.

## एकता विहारमध्ये भटक्या कुत्र्यांच्या दहशतीने रहिवासी त्रस्त



**नवी मुंबई :** सीबीडी बेलापूर सेक्टर-२५ येथील सीजीएस कॉलनी (एकता विहार) परिसरात वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या संख्येमुळे स्थानिक रहिवाशांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर सेंट्रल गव्हर्नमेंट एम्प्लॉईज रेसिडेन्शियल वेल्फेअर असोसिएशनचे माजी सचिव तसेच स्थानिक रहिवासी अनुज कुमार पांडेय यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांकडे ई-मेलद्वारे सविस्तर तक्रार दाखल करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, परिसरातील भटक्या कुत्र्यांची संख्या गेल्या काही महिन्यांत लक्षणीयरीत्या वाढली आहे. परिणामी लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला, शालेय विद्यार्थी तसेच सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कुत्र्यांकडून पादचाऱ्यांचा पाठलाग करणे, दुचाकीस्वारांवर भुंकत धावून जाणे आणि आक्रमक वर्तनाच्या घटना सातत्याने घडत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. यापूर्वीही अनेक वेळा महानगरपालिकेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यानंतर महापालिकेच्या डॉग स्क्वॉड पथकाने परिसराला भेट देऊन काही कुत्र्यांचे लसीकरण केले होते. मात्र, लसीकरणानंतर त्याच कुत्र्यांना पुन्हा परिसरात सोडण्यात आल्याने या कारवाईचा प्रत्यक्ष फायदा झाला नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. त्यामुळे ही कारवाई केवळ औपचारिकता होती का, असा प्रश्नही स्थानिकांनी उपस्थित केला आहे.


## टाकाऊ वस्त्र पुनर्प्रक्रिया केंद्रातून कापडी कचऱ्याच्या समस्येचे निराकरण आणि महिलांचे सक्षमीकरण



**नवी मुंबई :** सध्या वातावरणातील उष्म्याची स्थिती पाहता पर्यावरण बदलाचा किती त्रास होतो याचा अनुभव आपण घेत असून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सर्व पर्यायांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त करीत नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आपण वापरलेले कपडे टीआरएफ सेंटरद्वारे पुनर्वापरात आलेली आकर्षक वस्त्रे झाली व यामधून महिलांना नवी कौशल्ये शिकता आली आणि रोजगारही मिळाला हे या उपक्रमाचे यश असल्याचे सांगितले.

केंद्र सरकारच्या वस्त्रमंत्रालय अंतर्गत वस्त्र समिती आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने टिसर आर्टिसन ट्रस्ट,आयडीएच व एसबीआय फाऊंडेशन यांच्या सहयोगाने सीबीडी बेलापूर येथे सुरू असलेल्या वस्त्र पुनर्प्रक्रिया केंद्र मार्फत जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आयोजित महिला बचत गट उपजिविका संवाद कार्यक्रमप्रसंगी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, वस्त्र समितीचे संचालक तपनकुमार रौत, टीआरएफ केंद्राच्या विभागप्रमुख उपआयुक्त श्रीम.स्मिता काळे, डीसी हॅंडिक्राफ्टचे विभागीय संचालक दिपांशू हलदार, टिसरच्या संस्थापक डॉ.मेघा फणसळकर, सोमनाथ पोटरे, टीसरचे सीईओ के.डी.गणपती, टीआरएफ प्रकल्प संचालक प्रकाश सैनी व मुख्य डिझायनर श्रीम.नुतन कजबजे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# घणसोलीतील कुबेर अपार्टमेंटमध्ये भीषण आग; एकजण किरकोळ जखमी



**नवी मुंबई :** घणसोली (तळवली) येथील सेक्टर २१मधील कुबेर अपार्टमेंटमध्ये शुक्रवारी अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीने इमारतीच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरील काही भागाला वेघातल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच वाशी आणि ऐरोली अग्निशमन केंद्रातील जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने युद्धपातळीवर बचाव आणि आग विझविण्याचे काम हाती घेतले. धुराचे मोठे लोट बाहेर पडत असल्याने परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. खबरदारीचा उपाय म्हणून इमारतीतील रहिवाशांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले.

अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. या आगीत घरगुती साहित्य, फर्निचर आणि इतर वस्तूंचे नुकसान झाल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. आगीच्या झळांमुळे एका व्यक्तीला किरकोळ भाजले असून त्याला तातडीने प्राथमिक उपचार देण्यात आले. त्याची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात आले.

सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आगीमुळे रहिवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते. आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून विद्युत शॉर्टसर्किटसह विविध शक्यतांचा तपास संबंधित यंत्रणांकडून केला जात आहे.

दरम्यान, अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. घटनेनंतर परिसरात सुरक्षिततेच्या उपाययोजनांबाबत चर्चा सुरू असून इमारतींमधील अग्निसुरक्षा यंत्रणा नियमितपणे कार्यरत ठेवण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

# डोलाया सागरी किनारा सखोल स्वच्छता मोहीमेतून जागतिक पर्यावरण दिन साजरा

**नवी मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनाची यावर्षी सन २०२६ ची मध्यवर्ती संकल्पना 'हवामानासाठी आत्ताच कृती' जाहीर करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेने विविध उपक्रम राबविले आहेत व यामध्ये मोठ्या प्रमाणात लोकसहभागावर भर दिलेला आहे. असाच एक सागरी किनारा स्वच्छतेचा महत्वपूर्ण उपक्रम नवी मुंबई महानगरपालिका व शिवटेक्नॉ लॉजीज इंडिया प्रा.लि. यांच्या सहयोगाने पाम बिच मार्गानजिक समुद्रेश्वर मंदिराच्या बाजूच्या डोलाया सागर किनाऱ्याजवळच्या पाणथळ जागेत राबविण्यात आला.



यामध्ये महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी सहभागी होत सागरी किनाऱ्याच्या सखोल स्वच्छतेत प्रत्यक्ष योगदान दिले. या मोहीमेत महापालिका अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मीप्रमाणेच हेंकेल कंपनीचे प्रतिनिधी, इन्व्हायरमेंट लाईफ फाऊंडेशनचे स्वयंसेवक, नेक्सस मॉलचे कर्मचारी अत्यंत उत्साहाने मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी सहभागी २०० हून अधिक कर्मचारी, नागरिकांनी पाण्याच्या प्रवाहासोबत किना-यावर आलेला प्लास्टिक व तत्सम ११० गोणी कचरा गोळा केला. या सागरी किनारा सखोल स्वच्छता मोहीमेव्दारे 'हवामानासाठी आत्ताच कृती' या जागतिक पर्यावरण दिनाच्या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरून प्रत्यक्ष कृती करण्यात आली.

# कोपरखैरणेत अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

**नवी मुंबई :** ऐक्य, आध्यात्मिक परंपरा आणि वारकरी संस्कृतीचे जतन करणारे कोपरखैरणे गाव पुन्हा एकदा भक्तिरसात न्हाऊन निघाले आहे. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन सामाजिक आणि धार्मिक उपक्रम एकत्रितपणे साजरे करण्याची परंपरा जपणाऱ्या कोपरखैरणे ग्रामस्थांच्या वतीने यंदाही अधिक मास (पुरुषोत्तम मास) निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्री गाथा पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री विठ्ठल रखुमाई सेवा वारकरी मंडळाच्या वतीने शुक्रवार, ५ जून ते १२ या कालावधीत हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला असून संपूर्ण आठवडा गावात हरिनामाचा गजर आणि भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे.

अखंड हरिनाम सप्ताहाला वै. ह.भ.प. रामचंद्र महाराज बोधे (आळंदी), ह.भ.प. मारुती महाराज कुरेकर (आळंदी), स्वानंद सुखनिवासी वैकुंठवासी गुरुवर्य ह.भ.प. अदितवार महाराज म्हात्रे (कोपरखैरणे) तसेच वै. ह.भ.प. रघुनाथ महाराज म्हात्रे (कोपरखैरणे) यांचे आशीर्वाद लाभले आहेत.

सप्ताहादरम्यान दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ५ वाजता काकडा आरती, सकाळी ८ वाजता संगीत गाथा पारायण, दुपारी प्रवचन आणि रात्री ८ वाजता नवी मुंबईतील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. त्यामुळे भाविकांना सात दिवस अध्यात्म, भक्ती आणि ज्ञानाचा लाभ घेता येणार आहे.

सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी, १२ जून रोजी काल्याच्या महाप्रसादाने या धार्मिक सोहळ्याची सांगता होणार आहे.

# गुजरातच्या प्रसिद्ध आंब्याची बाजारात जोरदार आवक

**नवी मुंबई :** कोकणातील हापूस आंब्याचा हंगाम आता अखेरच्या टप्प्यात पोहोचला असताना बाजारपेठेत गुजरातच्या प्रसिद्ध केसर आंब्याने आपली उपस्थिती ठळकपणे जाणवून दिली आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच नवी मुंबईतील विविध किरकोळ बाजारपेठांमध्ये केसर आंब्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली असून त्याच्या सुगंधाने बाजारपेठा दरवळून गेल्या आहेत.

महाराष्ट्रात जसा हापूस आंब्याला मानाचा दर्जा आहे, तसाच गुजरातमध्ये केसर आंब्याला विशेष महत्त्व आहे. आकर्षक पिवळसर-केशरी रंग, मधुर चव आणि वैशिष्ट्यपूर्ण सुगंध यामुळे केसर आंबा ग्राहकांच्या पसंतीचा ठरत आहे. विशेषत: गुजराती आणि मारवाडी समाजामध्ये या आंब्याची मोठी मागणी असून हंगाम सुरू होताच बाजारात त्याची खरेदी वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.

## गुजरातमधून मोठ्या प्रमाणावर आवक

मे महिन्याच्या अखेरीस गुजरातमधील जुनागढ, वलसाड, वापी, धरमपूर आणि देगाम परिसरातून केसर आंब्याची आवक सुरू झाली आहे. या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर केसर आंब्याची लागवड केली जाते. येथील दर्जेदार फळे थेट मुंबई आणि नवी मुंबईच्या बाजारपेठांमध्ये दाखल होत आहेत. व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, जून आणि जुलै महिन्यात केसर आंब्याचा हंगाम बहरात असतो. त्यामुळे पुढील काही आठवडे बाजारात केसरची मुबलक उपलब्धता राहण्याची शक्यता आहे.

## दर सध्या स्थिर

सध्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत केसर आंब्याची मोठ्या प्रमाणावर आवक होत आहे. घाऊक बाजारात केसर आंबा ५० ते ६० रुपये प्रतिकिलो दराने विकला जात असून किरकोळ बाजारात त्याची किंमत सुमारे १०० रुपये प्रतिकिलो आहे.

व्यापारी संजय पिंपळे यांनी सांगितले की, येत्या आठवडाभरात गुजरातमधून आणखी मोठ्या प्रमाणावर माल येण्याची शक्यता आहे. आवक वाढल्यास दरात काहीशी घसरण होऊ शकते. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार केसर आंबा आणखी स्वस्तात मिळण्याची शक्यता आहे.

## आकर्षक रंग आणि गोड चवीमुळे पसंती

केसर आंब्याचा आकर्षक पिवळा रंग, किंचित लांबट व टोकदार आकार, कमी तंतुमय गर आणि नैसर्गिक गोडवा ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच वयोगटातील ग्राहकांमध्ये त्याची लोकप्रियता आहे.

हापूसनंतर देशातील सर्वाधिक पसंती मिळणाऱ्या आंब्यांमध्ये केसरचा समावेश होतो. त्यामुळे हापूसचा हंगाम संपत असतानाच बाजारपेठेत केसर आंब्याचा गोडवा आणि सुगंध ग्राहकांना आकर्षित करत असून पुढील काही आठवडे हा आंबा बाजारपेठेचा केंद्रबिंदू राहणार असल्याचे चित्र आहे.

हे साप्ताहिक मालक-मुद्रक-प्रकाशक-संपादक **श्री.संजू प्रल्हाद गुरव** यांनी रोशन प्रिन्टर्स, हिरा मनिषा अपार्टमेंट, गाळा नं. ७, शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र) -४१०२०६ येथे छापून एसएस-२, रुम नं.२१०, सेक्टर १६, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९ येथून प्रकाशित केले. **संपादक- श्री.संजू प्रल्हाद गुरव, मुख्य कार्यालय :** बी-२४, महावीर मार्केट, से.- १८, वाशी, नवी मुंबई. **पनवेल ऑफिस :** मोरबे गाव, द्वारका हौ.सोसा.बी-६ए ०१, **भ्रमणध्वनी: ९२२०७०४०९०. कायदेविषयक सल्लागार :** श्रद्धा खाडे-शहा